# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक १९.०६.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १३ ईसमांवर कारवाई करून ६,८९,३३१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये १० ईसमांवर कारवाई करून ९,४२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५३७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,३५,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचे गुन्ह्यातील पाहिजे आरोपीस अटक, ०५ गुन्हे उघडकीस .**

दिनांक ३०.०४.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०१.०५.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत, रेणूका माता मंदीर मागे, तरोडी विकास हाऊसिंग सोसायटी,प्लॉट नं. १५, नागपुर येथे राहणारे फिर्यादी राकेश नरहरी भुजाडे, वय ३६ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन, परिवारासह नवीन नगर येथे काकाकडे गेले असता, आरोपी १) आदित्य उर्फ आदि राजाराम शिंदे, वय २२ वर्षे, रा. प्लॉट नं. ९३, सुंदर नगर, नागपूर २) फैयाज एजाज अंसारी, वय २४ वर्षे, रा. दत्तकृपा लॉनचे मागे, हनुमान नगर, भांडेवाडी, नागपूर ३) आयुष उर्फ आमला नंदलाल गणविर, वय २१ वर्षे, रा. फुकट पान पॅलेसजवळ, हनुमान नगर, भंडेवाडी, नागपूर यांनी फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील वायरचे बंडल, स्पीकर, हॅमर ड्रील मशीन, सिलींग फॅन, सेटटॉप बॉक्स व लहान मुलांचे चांदीचे दागिने असा एकुण ३३,६००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपींविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता व आरोपी क्र. १ व २ यांना अटक करण्यात आली होती. पाहिजे आरोपी क्र. ३ चा शोध सुरू होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, गुन्ह्यातील पाहिजे आरोपीचा शोध घेवून आरोपी आयुष उर्फ आमला नंदलाल गणविर, वय २१ वर्षे, रा. फुकट पान पॅलेसजवळ, हनुमान नगर, भंडेवाडी, नागपूर यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतिरिक्त पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत—०१, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत —०२, पोलीस ठाणे पारडी हद्दीत —०१ घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीकडुन एकुण ०५ गुन्हे उघडकीस

आणलेले आहेत. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.




**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०६.२०२६ चे ०१.३० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट नं. ६२, चैतन्येश्वर नगर, शितला माता मंदीरजवळ, वाठोडा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शरद किसन निनावे, वय ३६ वर्षे हे आपले घराचे वास्तुपूजनाचा कार्यक्रम आटोपून परिवारासह खाली हॉलमध्ये झोपले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे वरील बेडरूमच्या दरवाजा उघडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीचे कुलूप तोडून, आलमारीमधील लोकांनी दिलेले लिफाफ्यामधील रोख २,५००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,४१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. प्रकाश मोर्य ९९२१३६४८१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे खापरखेडा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०६.२०२६ चे ०५.३० वा. ते ०६.०० वा. दरम्यान, फिर्यादीची आई नामे जिजाबाई कृष्णाजी गौरखेडे, वय ६५ वर्ष रा. वॉर्ड क्र. ४, भिमनगर, खापरखेडा, नागपूर ह्या पायदळ रस्त्याने घरी जात असता, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत कोराडी रोड, एपी बारचे समोर एका अज्ञात लाल रंगाची दुचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे आईला मागुन धडक देऊन त्यांचे डोक्याला व हाताला गंभीर जखमी करून पळुन गेला. जखमी फिर्यादीचे आईला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी सुनिल कृष्णाजी गौरखेडे, वय ३९ वर्ष रा. वॉर्ड क्र. ४, भिमनगर, खापरखेडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोहवा. गजानन राजुरकर ९९२३०७४७४६

यांनी अज्ञात दुचाकी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब),१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१८४ मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे जुनी कामठी :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १७.०६.२०२६ चे २३.१० वा. चे सुमारास, जुनी कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शर्मा देशी दारू भट्टीचे जवळ, रूईगंज मैदान, कामठी येथे एक इसम शस्त्र हातात घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून धुमधाम करीत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम हातात धारदार लोखंडी चाकू घेवुन धुमधाम करतांना दिसुन आला. त्यास स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन निशस्त्र केले व पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शकील अहमद इम्तीयाज अहमद वय ३९ वर्षे, रा. चंपा आश्रम जवळ, जे एन रोड, रूईगंज मैदानजवळ, कामठी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू किंमती २५०/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. मधूकर निखाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि. सागर भंडारी यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**४) पोलीस ठाणे जरीपटका :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १८.०६.२०२६ चे १८.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती शोभा दामोधर गजभिये वय ७३ वर्षे, रा. नवीन इंदोरा, बाराखोली चौक, गल्ली नं. ०१, जरीपटका, नागपूर ह्या पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत जैतवन बुध्द विहाराजवळील, सार्वजनिक रोडवरून जात असतांना दोन ४०—४५ वर्षे वयोगटाचे अनोळखी ईसमांनी संगनमत करून त्यापैकी एकाने फिर्यादीस पत्ता विचारल्याचा बहाणा करून बोलण्यात गुंतवून दुसऱ्याने फिर्यादीस, ‘‘येथुन २१ पावले समोर गेला तर लक्ष्मी पावेल व धनलाभ होईल’’ असे म्हणून फिर्यादी जवळील सोन्याचे किंमती ३,७५,०००/—रू. चे दागिने काढून आपले जवळ ठेवले. फिर्यादीने दागिने देवून २१ पावले समोर गेली व मागे पाहीले असता, दोन्ही अनोळखी आरोपी दिसून आले नाही. दोन्ही अनोळखी आरोपी यांनी फिर्यादीस २१ पावले समोर गेला तर धनलाभ होईल असे आमिष दाखवून फिर्यादीचे सोन्याचे दागिने घेऊन पळून जाऊन फिर्यादीची फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. सचिन खुटवळ ९०९६९५३२८६ यांनी दोन्ही अनोळखी आरोपींविरूध्द कलम ३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**नागपूर शहर पोलीसांचे आवाहन :—** जनतेला याद्वारे आवाहन करण्यात येते की, फसवणूकीच्या घटना वाढलेल्या असून वरीलप्रमाणे कोणीही कोणत्याही प्रकारे धनलाभ होईल याबाबत किंवा पैसे डबल करून देण्याचे आमिषास बळी पडू नये. कोणाचीही फसवणुक झालेली असल्यास, त्यांनी नजीकचे पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**